आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२६ जुलै २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- कारगिल युद्धातल्या विजयातून सत्य, संयम आणि सामर्थ्याचं अतुलनीय उदाहरण जगापुढे ठेवल्याचं, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- मुसळधार पावसामुळं पुणे आणि मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलल्या, सांगलीमध्ये लष्कराला पाचारण

- संसदेत आज अर्थसंकल्पावर चर्चा सुरू

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकचा उद्घाटन सोहळा आज रात्री

**<><><><><>**

कारगिलमध्ये आपण केवळ युद्ध जिंकलं नाही, तर सत्य, संयम आणि सामर्थ्याचं अतुलनीय उदाहरण जगापुढे ठेवलं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

२५ व्या कारगिल विजय दिना निमित्त, प्रधानमंत्री मोदी यांनी आज लडाख मधल्या कारगिल युद्ध स्मारकाला भेट दिली आणि कारगिल युद्धात कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या जवानांना त्यांनी आदरांजली वाहिली. त्यावेळी ते बोलत होते.  आजचा दिवस प्रत्येक भारतीयासाठी महत्वाचा असून, देशाचं रक्षण करणाऱ्या सर्वांना आदरांजली वाहण्याचा हा दिवस असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

भारत शांतता राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असताना, पाकिस्ताननं केलेल्या फसवणुकीचा उल्लेख करत, कारगिल युद्धात असत्य आणि दहशतीला, सत्यापुढे हार पत्करावी लागल्याचं ते म्हणाले.

दहशतवादाविरोधात निषेध नोंदवत, पाकिस्ताननं भूतकाळातून कोणताही बोध घेतला नसल्याचं ते म्हणाले.

प्रधानमंत्र्यांनी आज दूरस्थ पद्धतीनं लडाख मधल्या शिंकुन-ला बोगदा प्रकल्पाचा पहिला सुरुंग स्फोटही केला. निमू – पदुम – दारचा मार्गावर, जवळजवळ १५ हजार ८०० फूट उंचीवर बांधला जाणारा हा दुहेरी बोगदा वर्षभर लडाख या प्रदेशाबरोबर संपर्क प्रस्थापित करण्यासाठी महत्वाचा ठरेल.

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी कारगिल विजय दिना निमित्त देशाच्या सशस्त्र बलांप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे आणि त्यांना आदरांजली वाहिली आहे. त्यांचं बलिदान आणि शौर्य देशाच्या प्रत्येक नागरिकाला प्रेरणा देईल असं त्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. **गृहमंत्री** अमित शाह यांनी कारगिल विजय दिना निमित्त लष्कराच्या वीर जवानांच्या शौर्याला अभिवादन केलं आहे. कारगिलमध्ये तिरंगा ध्वज फडकावून या जवानांनी देशाचा गौरव वाढवल्याचं त्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

कारगिल युद्धात देशाच्या भूभागाचं रक्षण करण्यासाठी अत्यंत कठीण परिस्थितीत आपल्या प्राणांची बाजी लावणाऱ्या वीर जवानांना **संरक्षण मंत्री** राजनाथ सिंह यांनी अदांजली वाहिली आहे. **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार** यांनी कारगिल विजय दिना निमित्त आज कारगिल युद्धात आपल्या प्राणांची बाजी लावणाऱ्या शूर सैनिकांना अभिवादन केलं आणि त्यांना आदरांजली वाहिली.

<><><><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहात आज कामकाजाची सुरुवात  कारगिलमधल्या शहीदांना श्रद्धांजली अर्पण करून झाली. त्यानंतर दोन्ही सभागृहात प्रश्नोत्तराचा तास झाला. त्यानंतर म्हैसूर शहरी विकास प्राधिकरणातल्या कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरुन सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी निषेध व्यक्त केला. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याची मागणी त्यांनी केली. त्यामुळं झालेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज काही काळासाठी तहकूब झालं होतं. सध्या लोकसभा आणि राज्यसभेत अर्थसंकल्पावर चर्चा सुरू आहे.

<><><><><>

केंद्र सरकारने अनेक पिकांच्या किमान हमीभावात मोठ्या प्रमाणात वाढ केल्याचं, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं आहे. ते आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. केंद्र सरकार सातत्याने शेतकऱ्यांच्या लाभासाठी निर्णय घेत असल्याचं त्यांनी नमूद केलं. गेल्या अनेक वर्षात गव्हासह इतर पिकांचं सरकारकडून खरेदीचं प्रमाण वाढलं असून, खतांवरच्या अनुदानातही भरघोस वाढ केल्याचं चौहान यांनी नमूद केलं.

<><><><><>

राज्यसभेत शून्य काळात खासदार सुधा मूर्ती यांनी, हॉटेल व्यावसायिकांकडून अन्नपदार्थात वापरल्या जाणाऱ्या सिन्थेटिक रंग, सिन्थेटिक व्हिनेगर तसंच टेस्टिंग पावडरच्या दुष्परिणामांकडे लक्ष वेधलं.

यासंदर्भात नियंत्रणासाठी देशभरात शंभरावर अन्न परीक्षण प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचं, अन्न प्रक्रिया मंत्री चिराग पासवान यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशाची कृषी निर्यात आणि आयात क्षमतेला चालना देण्यासाठी जवाहरलाल नेहरू बंदरामध्ये भारतातली पहिली एकात्मिक कृषी निर्यात सुविधा उभारली जाणार आहे. केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सार्वजनिक-खासगी तत्त्वावर हे आयात-निर्यात आणि स्थानिक कृषी मालावर आधारित प्रक्रिया आणि साठवणी सुविधा केंद्र विकसित करायला मंजुरी दिली असून, त्यासाठी २८४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या सर्वसमावेशक कृषी सुविधेच्या उभारणीमुळे लॉजिस्टिक सुविधा सुलभ होईल, अपव्यय कमी होईल आणि कृषी मालाला चांगला दर मिळेल, असं सोनोवाल म्हणाले. शेतकऱ्यांचं सक्षमीकरण करण्यासाठी आणि भारताच्या कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी हे महत्वाचं पाऊल ठरणार असून, बिगर-बासमती तांदूळ, मका, मसाल्याचे पदार्थ, कांदा आणि गहू यासारख्या प्रमुख उत्पादनांच्या निर्यातीला प्रोत्साहन मिळेल असं सोनोवाल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात सर्वदूर जोरदार पाऊस सुरु आहे. अतिवृष्टीमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुक्त आणि दूरस्थ अध्ययन प्रशालेच्या आज तसंच उद्या होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विद्यापीठाच्या उर्वरित परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार होतील, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिली आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातल्या २८०० पेक्षा अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं असून शहरात बचावकार्य सुरू आहे अशी माहिती महापालिकेने दिली आहे.

**रायगड आणि रत्नागिरी** जिल्ह्यातल्या अतिवृष्टीमुळे मुंबई विद्यापीठाच्या आज सकाळी तसंच दुपारी होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

**सांगली** भागातली पूरपरिस्थिती हाताळण्यासाठी शंभर जणांचं लष्करी पथक तैनात करण्यात आलं आहे. या पथकात प्रत्यक्ष सैनिकांसोबतच वैद्यकीय कर्मचारी आणि अभियंत्यांचा समावेश आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यातल्या राधानगरी, दुधगंगा, वारणा आणि तुळशी या धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. जिल्ह्यातल्या सर्व नद्या धोका पातळीला वाहत आहेत.

**रायगड** जिल्ह्यात अलिबागजवळ अडकलेल्या मालवाहू जहाजावरून चौदा कर्मचाऱ्यांची भारतीय तटरक्षक दलाने सुटका केली. खवळलेल्या समुद्रामुळे हे जहाज संकटात सापडलं होतं. हेलीकॉप्टरच्या सहाय्याने जहाजातल्या कर्मचाऱ्यांना किनाऱ्यावर आणण्यात आलं.  स्थानिकांच्या मदतीने त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

**<><><><><>**

गाझा पट्टीत हमाससोबत लवकरात लवकर शस्त्रसंधी करण्याचं आवाहन अमेरिकेनं इस्राइलला केलं आहे. इस्राइलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यान्याहू  यांनी आज वॉशिंग्टनमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन आणि उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांची भेट घेतली. त्यावेळी हॅरिस यांनी ही विनंती नेत्यान्याहू  यांना केली. शस्त्रसंधीमधले अडथळे लवकरात लवकर दूर करुन बंदी ठेवलेल्या नागरिकांची लवकरात लवकर सुटका करण्याचं आवाहन बायडेन यांनी केलं.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ चा उद्घाटन सोहळा आज होत असून, भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ११ वाजता पॅरिसमधल्या सीन नदीच्या किनाऱ्यावर या भव्य सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. ऑलिम्पिकच्या इतिहासात पहिल्यांदाच स्टेडियम बाहेर उद्घाटन सोहळा होणार आहे. यावेळी सीन नदीमध्ये १० हजार खेळाडूंना घेऊन १०० नौका परेड मध्ये सहभागी होतील.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या देशांच्या खेळाडूंचा समावेश असलेली परेड पॅरिस मधल्या काही महत्वाच्या स्थळांवरून पुढे जाईल. तीन तासांचा हा कार्यक्रम जगाला पॅरिसचा इतिहास आणि स्थापत्यकलेचा प्रवास घडवेल. परेड मध्ये भारताचं नेतृत्व ऑलिम्पिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधू आणि टेबल टेनिस पटू शरथ कमल करणार आहेत.

पॅरिस ऑलिम्पिक मध्ये भारतानं काल शानदार सुरुवात केली असून, नेमबाजीमध्ये रँकिंग फेरीत भारतीय पुरुष संघानं तिसरं स्थान, तर महिला संघानं चौथं स्थान मिळवून उपांत्यपूर्व फेरीत आपलं स्थान निश्चित केलं.

**<><><><><>**

श्रीलंकेत सुरू असलेल्या महिलांच्या टी-20 आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताचा सामना बांग्लादेशसोबत होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी २ वाजता हा सामना सुरू होत आहे. तत्पूर्वी बांग्लादेशनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेच्या राष्ट्रपती पदाची निवडणूक २१ सप्टेंबर रोजी होणार आहे. श्रीलंकेच्या निवडणूक आयोगानं १५ ऑगस्टपर्यंत यासाठी अर्ज मागवले आहेत. २०१८ मध्ये झालेल्या निवडणुकीत गोटाबाया राजपक्षे ५ लाख मतांनी विजयी

झाले होते. मात्र त्यानंतर आलेल्या आर्थिक आणि राजकीय संकटामुळं त्यांनी राजीनामा दिला होता.

**<><><><><>**

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल काश्मीर खोऱ्यात नियंत्रण रेषेजवळच्या भागांना भेट दिली आणि सैन्याच्या तयारीचा आढावा घेतला. कुपवाडा इथं झालेल्या दहशतवादविरोधी कारवाईत प्राणांची आहुती देणाऱ्या नाईक दिलावर खान यांना जनरल द्विवेदी यांनी श्रद्धांजली वाहिली. यावेळी जनरल द्विवेदी यांच्यासह जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, लष्कराचे उत्तर विभागाचे प्रमुख, चिनार कॉर्प्सचे कमांडर आणि इतर अधिकारी तसंच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यात छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि सोलापूर या जिल्ह्यात तातडीनं कांदा बँक सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. काल कांदा महाबँक प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

कांदा हे नाशवंत पीक असून त्याची नासाडी रोखण्यासाठी अणुऊर्जेच्या साहाय्यानं त्यावर विकिरण प्रक्रिया करून कांद्याची साठवणूक करता येईल. या कांदा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना फायदा होणार असून अहमदनगर जिल्ह्याच्या राहुरी तालुक्यातून या योजनेची सुरुवात होईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिली. हिंदुस्थान ॲग्रो या संस्थेच्या माध्यमातून या बँकेची स्थापना होत असून या बँकांच्या उभारणीसाठी औद्योगिक विकास महामंडळ, पणन विभाग, तसंच राज्य रस्ते विकास महामंडळाच्या उपलब्ध जागांचा वापर केला जाईल, अशा सूचनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी केल्या.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२६ जुलै २०२४ - शुक्रवार

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२६ जुलै २०२४ - शुक्रवार